# मुंबई विद्यापीठ

क्रं.घ.म./२६ / २०१३-२०१४

**संदर्भ** - क्रं.घ.म./ ३ / २०१२-२०१३

परिपत्रक :-

**मुंबई विद्यापीठाशी** संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या प्रित्यर्थ राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषेतून निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, काव्यसंध्या, मराठी भाषेचा विकास व संवर्धनासाठी संगणकावर मराठी भाषेचा वापर इत्यादी विषयांवर परिसंवाद / चर्चासत्र यांचे आयोजन करावे अशा सूचना आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांना / संस्थांना देण्यात याव्यात असे शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१२/प्र.क्र. ७१/विशि-३, दिनांक २४ फेब्रुवारी, २०१२ अन्वये आदेश निर्गमित केलेला आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी व दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून दरवर्षी साजरा करण्यात यावा. तसेच, सदर कार्यक्रमांचा अहवाल संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, यांना एक महिन्याच्या आत सादर करावा ही विनंती.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २४/०२/२०१४

25/2/14

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकिय आणि शासकिय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रत माहीतीस्तव रवाना :-

१. मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
५. स्वीय सहायक, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्रभारी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
७. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).
८. समन्वय, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताकुझ, मुंबई - ४०० ०९८.